**एकात्मिक बालविकास प्रकल्प मानखुर्द**

जिल्हा – मुंबई उपनगर

अंगणवाडी बीट – म्हाडा कॉलनी – सेक्टर-04

अंगणवाडी विभाग – मातंगऋषीनगर, मानखुर्द, मुंबई-43

अंगणवाडी क्र. – 48

**नवोपक्रम 2022-2023**

"या फुलपाखरांनो अंगणवाडीत इंग्रजी शिकू या"

**नवोपक्रम कर्ता** – सौ. वैशाली सुभाष डेळेकर

अंगणवाडी सेविका-मानखुर्द

## स्पर्धकांची माहिती

1. स्पर्धकाचे पूर्ण नाव – सौ. वैशाली सुभाष डेळेकर
2. भ्रमणध्वनी – 9372994485
3. इ-मेल – delekarvaishali@gmail.com
4. कायमचा पत्ता – नेरुळगाव, सेक्टर-20,नेरुळ, नवी मुंबई
5. जन्मतारीख – 25/8/1982
6. शैक्षणिक अर्हता – B.A.
7. एकूण सेवा – 17 वर्ष 11 महिने
8. नवोपक्रम विषय – इंग्रजी
9. नवोपक्रम शीर्षक – “या फुलपाखरांनो अंगणवाडीत इंग्रजी शिकू या”



# अनुक्रमणिका


| अ.नं. | नवोपक्रमाच्या पायऱ्या | पान नं. |
|---|---|---|
| | | |
| 1 | प्रस्तावना | 4 |
| 2 | नवोपक्रमाची माझी गरज | 5 |
| 3 | नवोपक्रमाची उद्दिष्टे | 6 |
| 4 | नवोपक्रमाचे नियोजन | 7 |
| 5 | नवोपक्रमाची कार्यवाही | 11 |
| 6 | नवोपक्रमाची यशस्विता | 17 |
| 7 | समारोप | 21 |
| 8 | संदर्भ ग्रंथ | 22 |

## प्रस्तावना

आपल्या महाराष्ट्रातील अंगणवाड्या कोरोना काळात बंद झाल्या होत्या, त्या 16 मे 2022 रोजी सर्वत्र उघडण्यात आल्या. दोन वर्षानंतर अंगणवाड्या उघडल्या गेल्या. या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये ऑनलाईन शिक्षण देण्यात आले.

या दोन वर्षाच्या काळात बालकांना धान्य वाटप होत होते. अंगणवाड्या सुरू झाल्या व शिजवलेला आहार सुरू झाला. 0 ते 3 वर्षे वयोगटासाठी व गरोदर, स्तनदा मातांसाठी THR (सुकडी – शिरा – उपमा - बालभोग) सुरू झाला होता त्यामुळे पालक नाराज झाले. प्रत्येक सेक्टर मधून 5 अंगणवाड्यांना हा THR मिळत होता. इतर लोकांना धान्य मिळते व आपल्याला THR त्यामुळे जास्तच पालक नाराजी व्यक्त करू लागले. याचा परिणाम म्हणजे बालकांची उपस्थिती कमी झाली. त्यामुळे पट 72 असूनही जून महिन्यापर्यंत जेमतेमच मुले अंगणवाडीत येत होती. त्यामुळे मला चिंता वाटू लागली.

बालकांची उपस्थिती वाढवण्यासाठी व पालकांची मने जिंकण्यासाठी काहीतरी नाविन्यपूर्ण करणे गरजेचे होते. यातूनच या नवोपक्रमाचा जन्म झाला. या उपक्रमामुळे अंगणवाडीतून काहीतरी मिळते म्हणून बालकांना अंगणवाडीत पाठवण्यापेक्षा ती ज्ञानाच्या, शिक्षणाच्या ओढीने अंगणवाडीत यायला लागली. याचे समाधान मला मिळाले. पालकांना अंगणवाडी विषयी व शिक्षणाविषयी अत्यंत आदर निर्माण झाला.

## नवोपक्रमाची माझी गरज

आमच्या अंगणवाड्या कोरोना काळात मार्च 2020 पासून बंद झाल्या त्या 16 मे 2022 ला चालू झाल्या. तोपर्यंत बालकांना ऑनलाईन शिक्षण दिले गेले. 16 मे 2022 ला अंगणवाडीतील बालकांचे स्वागत करून अंगणवाडीतून शिक्षणाला सुरुवात झाली. प्रत्येक अंगणवाडी सेविकेने वेगवेगळ्या पद्धतीने बालकांचे स्वागत केले. दोन वर्षानंतर अंगणवाडी सुरू झाली.

मे महिना म्हणजे सुट्ट्यांचा कालावधी अर्धी मुले गावाला गेली. जून, जुलैपर्यंत मुले गावावरून परत येत होती. अंगणवाडी पट 72 असूनही मुले अंगणवाडीत कमी येत होती. म्हणून त्याचे कारण पालकांना विचारल्यावर लक्षात आले की कोरोना काळात मिळणारे धान्य बंद झाल्यामुळे व त्या ऐवजी THR (सुकडी-शिरा-उपमा) आल्यामुळे पालक अतिशय नाराजी व्यक्त करत होते. त्यात "दुष्काळात तेरावा महिना" म्हणीप्रमाणे, आजूबाजूच्या अंगणवाड्यांमध्ये शून्य ते तीन वर्षे वयोगटाला धान्य मिळते व आमच्या मातंग ऋषी नगर मधील फक्त पाच अंगणवाड्यांना THR मिळतो. भाडोत्री राहणारे लोक धान्य मिळते त्यां नगरांमध्ये स्थलांतर करू लागल्यामुळे बालकांची उपस्थिती फार कमी होऊ लागली. त्यामुळे मला फार चिंता वाटू लागली. कशी यांची मने वळवू ? हा प्रश्न मला पडला होता. पाच वर्षे पूर्ण झालेली बालके सर्व शाळेत जाऊ लागली. त्यात नवीन भर म्हणजे कोरोना काळात नोकऱ्या गेल्यामुळे लोक लहान मुलांचे क्लासेस घेऊ लागले, असे माझ्या सर्व्हे मध्ये 6 ते 7 क्लास निर्माण झाले होते. फक्त ABCD शिकवणारे नव्हे तर स्पेलिंग वाक्य लिहण्यापर्यंत व 1 ते 100 अंक बेचे पाढे 2 ते 10 पर्यंत. या 3 ते 5 वयोगटातील मुलांना हे अति जास्त शिक्षण झाले असे नाही का वाटत ? क्लासेस घेणारे हे शिक्षक मुलांना पाढे न आल्यास त्यांना धोपटतात, रागावतात हे मुलांनी मला सांगितले. तेव्हा मी घरोघरी जाऊन पालकांना भेटले. पहिले त्यांचे क्लासेसला जाणे बंद केले. पालकांची मिटिंग घेऊन त्यांना अंगणवाडीतून मिळणारे अनौपचारिक शिक्षणांबद्दल माहिती दिली. त्याच मिटिंगमध्ये या नवीन उपक्रमाबद्दल पालकांनी संमती दिली. व या नवोपक्रमाची सुरुवात झाली.

नवोपक्रमामुळे मुले अंगणवाडीत वेळेवर हजर व्हायला लागली व उपस्थिती वाढली.

## नवोपक्रमाची उद्‌दीष्टे

1. अंगणवाडीतील बालकांची उपस्थिती वाढावी.
2. पालकांना अंगणवाडीतील शिक्षणाचे महत्त्व समजावे.
3. बालकांनी हसत खेळत, तणावमुक्त शिक्षण अंगणवाडीतून घ्यावे. अंगणवाडीची ओढ वाढावी.
4. इंग्रजी विषयाचा पाया भक्कम व्हावा.
5. इंग्रजी भाषेचे श्रवण व संभाषण कौशल्य विकसित करणे.

## नवोपक्रमाचे नियोजन

अंगणवाडीत नियोजनबद्ध उपक्रमांची आखणी केली आहे. “या फुलपाखरांनो अंगणवाडीत इंग्रजी शिकू या” हा नवोपक्रम अंगणवाडीमध्ये प्रथमच राबविण्यात आला. बालकांमध्ये विविध कौशल्य विकसित करण्यासाठी विचारपूर्वक नियोजन करण्यात आले.

### नवोपक्रमाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत उपक्रम हा मुंबई मानखुर्द येथून मातंग ऋषीनगर या विभागातून अंगणवाडी क्रमांक 48 येथे राबविण्यात आला. 1 जुलै 2022 ते 31 ऑक्टोंबर असा चार महिन्यांच्या कालावधीत “या फुलपाखरांनो अंगणवाडीत इंग्रजी शिकू या” हा नवोपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम अंगणवाडीतील सर्व बालकांसाठी आहे. वयोगट 3 ते 4, 4 ते 6 आहे.

### नवोपक्रमाचा अपेक्षित अभ्यासक्रम

1. इंग्रजी भाषा विकास होणे.
2. अक्षरांचे अवयव रेखाटन करणे.
3. इंग्रजी (capital Alphabets) अक्षरे ओळख.
4. इंग्रजीतून कृतीयुक्त गाणी
5. इंग्रजी संभाषणावर व श्रवणावर भर देणे.

### नवोपक्रम कार्यवाहीचे टप्पे

- 1 जुलै 2022 ते 30 जुलै 2022 - इंग्रजी भाषेची ओळख, अक्षर अवयव काढणे, अक्षर अवयव वाचन, अवयव जोड्या लावणे, गाणी
- 1 ऑगस्ट 2022 ते 31 ऑगस्ट 2022 – इंग्रजी मुळाक्षरे (Capital letter) Alphabets – लेखन व वाचन करणे. गाणी, stand up – उभे राहा, sit down- बसा, Good Morning Teacher
- 1 सप्टेंबर 2022 ते 30 सप्टेंबर 2022 - इंग्रजी मुळाक्षरे, वाचन, गाणी, प्राणी, पक्षी, फळे, रंग, लेखन यांची इंग्रजी शब्दांतून ओळख
- 1 ऑक्टोंबर 2022 ते 31 ऑक्टोंबर 2022-
    1. Match the Alphabets - अक्षरांच्या जोड्या लावा
    2. Match the Alphabets with picture – चित्र पाहून अक्षरांच्या जोड्या लावा
    3. Write capital Alphabets-A to Z
    4. Circle the correct Alphabets – चित्र पाहून अक्षराला गोल करणे
    5. गाणी

# वेळापत्रक

| महिना | वयोगट | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जुलै 2022 | 3 ते 4 | इंग्रजी भाषेची ओळख | अवयव लेखन | अवयव वाचन | अवयव जोड्या लावणे | अवयव लेखन | गाणी |
| | 4 ते 6 | इंग्रजी भाषेची ओळख, अवयव लेखन | अवयव लेखन, वाचन | अवयव जोड्या लावणे | अवयव लेखन, वाचन, जोड्या लावणे | अवयव लेखन गाणी | गाणी |
| ऑगस्ट 2022 | 3 ते 4 | अवयव लेखन, वाचन, जोड्या लावणे | इंग्रजी मुळाक्षरे वाचन, | इंग्रजी मुळाक्षरे लेखन | इंग्रजी मुळाक्षरे वाचन | इंग्रजी शब्द बोलणे Good Morning, Teacher | गाणी |
| | 4 ते 6 | अवयव लेखन, वाचन, जोड्या लावणे | इंग्रजी मुळाक्षरे वाचन, लेखन | इंग्रजी मुळाक्षरे वाचन, लेखन | इंग्रजी मुळाक्षरे वाचन, लेखन | इंग्रजी शब्द बोलणे Sit down Stand up | इंग्रजी शब्द बोलणे गाणी |
| सप्टेंबर 2022 | 3 ते 4 | इंग्रजी मुळाक्षरे वाचन | इंग्रजी मुळाक्षरे लेखन | इंग्रजी शब्द बोलणे | प्राणी नावे | पक्षी नावे | गाणी रंगांची नावे |
| | 4 ते 6 | इंग्रजी मुळाक्षरे वाचन, लेखन | इंग्रजी मुळाक्षरे जोड्या लावणे | इंग्रजी शब्द बोलणे, फळे यांची नावे वाचन | इंग्रजी प्राणी, फुले, फळे यांची नावे वाचन | इंग्रजी प्राणी, पक्षी यांची नावे वाचन | गाणी प्राणी, रंग, पक्षी यांची नावे |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑक्टोबर 2022 | 3 ते 4 | इंग्रजी मुळाक्षरे वाचन, लेखन | इंग्रजी मुळाक्षरे जोड्या लावणे | प्राणी, पक्षी नावे | रंग, फळे नावे | फळे, फुले नावे | गाणी |
| | 4 ते 6 | इंग्रजी मुळाक्षरे वाचन, लेखन, जोड्या लावणे | इंग्रजी मुळाक्षरे व चित्र पाहून जोड्या लावणे. प्राणी नावे | इंग्रजी मुळाक्षरे A to Z लेखन, वाचन पक्षी नावे | चित्र पाहून अक्षराला गोल करा. रंग नावे, गाणी | इंग्रजी मुळाक्षरे व चित्र पाहून जोड्या लावणे. फळे नावे | गाणी फळे, पक्षी, प्राणी नावे |

## उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण

नवोपक्रमाची सुरुवात करण्यापूर्वी बालकांची उपस्थिती फार कमी झाली होती. घरोघरी जाऊन पालकांशी भेट घेऊनही पालक आपल्या बालकाला अंगणवाडीत पाठवत नव्हते.

## संबंधित व्यक्तींशी, तज्ज्ञांशी चर्चा

अंगणवाडीतील बालकांची उपस्थिती कमी झाल्याचे आमच्या मुख्यसेविका सौ. कविता जाधव मॅडम यांच्याकडे याविषयी सांगितल्यावर, त्यांनी नवीन आकर्षक असा उपक्रम राबवावा, जेणेकरून पालकांचे मत परिवर्तन होईल असा सल्ला दिला. ह्या मताला आमचे प्रकल्प अधिकारी श्री. शरद कुऱ्हाडे सर यांनीही पाठिंबा दिला.

नवीन उपक्रम राबविण्यासाठी सर्वांनी पाठिंबा, प्रोत्साहन दिल्यामुळे हा उपक्रम राबवण्याची संधी मिळाली.

## आवश्यक साधनांचा विचार

1. पालकांची मिटींग घेऊन प्रत्येक महिन्याच्या वेळापत्रकानुसार अभ्यासक्रम समजावून सांगितला.
2. पालकांनी आपल्या बाळाने दररोज काय अभ्यास केला ते घरी प्रेमाने बालकाला विचारावे त्याची वहीतील नोंदी व इतर कृती पहावी.
3. अंगणवाडीमध्ये शिकवलेली गाणी मुलांकडून पालकांनी कृतीयुक्त करून घेणे.
4. बालकांना प्रत्येक कृती, लेखन, वाचन घेताना प्रोत्साहन देणे.

## कृतींचा क्रम

1. अक्षर अवयव लेखन व अक्षर अवयव वाचन
2. इंग्रजी capital letter Alphabets लिहिणे व वाचन करणे
3. Match the Alphabets - अक्षरांच्या जोड्या
4. Match the Alphabets with the picture - चित्रांवरून अक्षरांच्या जोड्या लावणे.
5. Fill in the blanks - रिकाम्या जागी अक्षरे भरणे.
6. Circle the correct Alphabets - चित्र पाहून अक्षराला गोल करणे.
7. गाणी – Rhymes
8. शरीराचे अवयव इंग्रजीतून ओळखणे. Body parts

## उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण

नवोपक्रमाची सुरुवात केल्यावर बालकांची उपस्थिती वाढली. पालक आज नवीन काय शिकवले हे मुलांना विचारू लागले. बालके हसत खेळत आनंदाने अंगणवाडीतील सर्व अभ्यास घरी सांगू लागले. घरी दिलेला गृहपाठ पूर्ण करून दुसऱ्या दिवशी वह्या तपासणीसाठी अंगणवाडी जमा व्हायला लागल्या. पालकांचीही मीटिंगसाठी उपस्थिती वाढू लागली. बालक इंग्रजी Alphabets वाचू लिहू लागली. मुले आनंदाने इंग्रजी शिकू लागली. इंग्रजीतून रंग, प्राणी, पक्षी, फळे, फुले, शरीराचे अवयव बालके सांगू लागली. बालकांबरोबर पालकांचाही आत्मविश्वास वाढला. यामध्येच माझा नवोपक्रम साध्य झाला आहे. मी हा उपक्रम असाच चालू ठेवणार आहे.

## नवोपक्रमासाठी इतरांची मदत

नवोपक्रमासाठी आमच्या मुख्य सेविका सौ. कविता जाधव मॅडम यांनी वेळोवेळी मदत केली. प्रोत्साहन दिले. आमचे प्रकल्प अधिकारी श्री. शरद कुऱ्हाडे सर यांनीही प्रोत्साहन दिले व मार्गदर्शन केले.

माझी मदतनीस - साधना श्रीरंग जगताप व माझी मदतनीस मैत्रीण माया विठोबा कामतकर यांनी मला मोलाची साथ दिली. तसेच माझ्या घरातून माझ्या मुलांनीही मला साथ दिली. वेळोवेळी मदत केली. माझ्या अंगणवाडीतील बालक व त्यांचे पालक यांच्या साथीनेच हा नवोपक्रम बहरला आहे.

तसेच या नवोपक्रमासाठी आकार बालशिक्षण आधारित अंगणवाडी सेविकांसाठी हस्तपुस्तिका व ICDS – पूर्व शालेय संच खेळणी, Unicef कडून येणाऱ्या युट्युब लिंकचा वापर केला.

## नवोपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे

या उपक्रमामध्ये बालकांचे कृतीविषयक , फोटो उपलब्ध आहेत.

## नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही

कोरोना काळात सर्व ठिकाणी शाळा,कॉलेज बंद झाली. अंगणवाडी त्यासाठी अपवाद नव्हती. या दोन वर्षाच्या कालावधीत ऑनलाइन शिक्षण चालूच होते. अंगणवाडीतील मुक्तछंदपणे फुलपाखरांचे बागडणे थांबले होते. अखेर १६ मे 2022 रोजी सर्व महाराष्ट्रात अंगणवाडी उघडल्या गेल्या. दोन वर्षांची मरगळ झटकून सर्वजण आपल्या अंगणवाडीची स्वच्छता, मुलांचे स्वागत करण्यासाठी सज्ज झाले. अंगणवाड्यांमध्ये अंगणवाडी सेविकांनी फुलांचे सुशोधन करून, रांगोळी काढून, तर कोणी फुगे, पताके लावून अंगणवाड्या सजवल्या. मुलांना खाऊ देऊन, तसेच काही सेविकांनी तर मुलांच्या हस्ते केक कापून त्यांचे स्वागत केले. अंगणवाडी जणू या चिमण्यांच्या किलबिलाटासाठी आसुसलेल्या होत्या. एक वेगळाच आनंद दरवळत होता. सर्वजण या दिवसांची वाट पाहत होते.

अंगणवाडीची मे महिन्यात सुरुवात झाल्यावर लोकांची गावी जाण्याची सुरुवात झाली. गावी गेलेले सर्व लोक जून महिन्यापर्यंत गावावरून येऊ लागली. पालक गावावरून आल्यावर गृहभेटीदरम्यान त्यांना बालकांना अंगणवाडीत पाठवावे असे सांगितले. पाच वर्षे पूर्ण झालेली बालके शाळेत जाऊ लागली. काही बालके अंगणवाडीच्या वेळेत खाजगी क्लासेसला जात असल्याचे समजले तेव्हा मी पालकांना भेटले. अंगणवाडीत मोफत शिक्षण, आहार असताना सर्व विषय शिकवत असताना तुम्ही आपल्या मुलांना खाजगी क्लासेसला का पाठवता असे विचारल्यावर पालकांनी अंगणवाडी बंद होती. मुले घरी मस्ती करत होती. म्हणून 1-2 तास तरी एका जागेवर बसू देत यासाठी क्लासला पाठवत होतो असे सांगितले. पालकांची मीटिंग घेऊन त्यांना अंगणवाडीतील अनौपचारिक शिक्षण याबद्दल माहिती दिली. आम्ही बालकांना शास्त्रशुद्ध बाल शिक्षण देतो. त्यामुळे बालकांचा सर्वांगीण विकास होतो. बालकांनी नेमके काय शिकावे व कसे शिकावे याविषयी योग्य तो शैक्षणिक दृष्टिकोन आम्ही निर्माण करतो. त्यावर पालकांचे प्रश्न होते, पुढीलप्रमाणे :-

1. आमची मुले इंग्रजी माध्यमातून शिकणार आहेत, त्यामुळे त्यांना इंग्रजी शिकवा.
2. गेल्या वर्षी जसे नवोपक्रम राबविला तसा ह्यावर्षीही घेणे. (इंग्रजीतून)
3. सराव पेपर काढणे.
4. बालकांची प्रत्येक मिटींगला प्रगती सांगणे.

सर्वानुमते या नवीन उपक्रमाला सुरुवात झाली. 1 जुलै पासून आपण नवीन उपक्रमाला सुरुवात करणार आहोत हे सांगितल्यावर बालकांची उपस्थिती वाढली व उपक्रमाला सुरुवात झाली. सर्व विषयांसोबत इंग्रजी विषय ही शिकवायला सुरुवात झाली. नुसतीच ABCD शिकवणे आणि इंग्रजी गाणी घेणे यापेक्षा काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याची गरज होती यासाठी मी आकार बालशिक्षणक्रम आधारित पुस्तिकांचा आधार घेतला. त्यातून इंग्रजी गाणी, कृती घेतल्या. ICDS कडून प्राप्त पूर्व शालेय शिक्षण संचांमधून – अवयव लेखन, अल्फाबेट्स खेळणी, अल्फाबेट चार्ट, बॉडी पार्ट्स, फळे, फुले, भाज्या, रंग, प्राणी, पक्षी खेळण्यांद्वारे तक्त्यांद्वारे इंग्रजी नावे शिकवली. यासाठी पूर्व शालेय संच खेळणी यांचा फार उपयोग झाला.

प्रत्येक मीटिंगमध्ये वेळापत्रकानुसार पुढील अभ्यासक्रम सांगण्यात आला. पालकांची मते ऐकण्यात आली. त्यानुसार मी तक्ते तयार केले. तक्त्यांद्वारे अभ्यासक्रम घेणे सोपे झाले. इंग्रजी माध्यमातून आपल्या बालकांना शिक्षण मिळावे अशी इच्छा, मते पालकांची दिसून येत आहेत. इंग्रजी माध्यमातून शिक्षण म्हणजे उत्कृष्ट शिक्षण असे पालकांचा समज होत चालला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त इंग्रजी माध्यमाकडे कल वाढत चालला आहे. इंग्रजी शब्द आपण घरी, बाहेर बोलत असतोच. इंग्रजी शब्दांचा वापर दररोज करत असतो. जसे – टेबल, फॅन, पेन, पेन्सिल, टीव्ही, मोबाईल, फ्रिज, वॉशिंग मशीन, मिक्सर ग्राइंडर, हिटर, गिझर असे अनेक घरगुती वस्तूंची नावे इंग्रजीतून आपण बोलत असतो. पण पूर्ण वाक्य आपल्याला बोलता येत नाही त्यामुळे इंग्रजी आपल्याला कधीच बोलता येणार नाही असा समज होतो. आपल्याकडील चांगले शिक्षित लोकही इंग्रजी बोलायला घाबरतात. आणि एक प्रकारे सर्वांच्या मनात इंग्रजी विषयाबद्दल न्यूनगंडच निर्माण झाले आहे.

इंग्रजी विषयाबद्दल मुलांना आवड निर्माण करणे. इंग्रजी विषयाचा पाया भक्कम करणे हे उद्दिष्ट समोर ठेवून दररोज इंग्रजी छोटी वाक्य मुलांकडून बोलून घेणे जसे – stand up, sit down, slow-fast, good morning teacher, good night, breakfast, lunch, dinner, thank you, sorry असे शब्द बोलण्याचा सराव केला. वाचन, लेखन, गाणी यांद्वारे इंग्रजी विषयाची ओळख करून दिली. त्यामुळे बालकांमध्ये आवड, आत्मविश्वास निर्माण झाला. पालकांनाही अंगणवाडी विषयी आदर वाटू लागला.

लेखनाद्वारे, वाचनाद्वारे भरपूर सराव करून घेतला. त्यांच्यासाठी तक्ते तयार केले तक्त्यांद्वारे सराव केला. गाणी कृतीयुक्त घेतली. 3 ते 4 वयोगट व 4 ते 6 वयोगटानुसार अभ्यासक्रम घेतला आहे.

माझ्या अंगणवाडीतील बालकांना इंग्रजी अक्षर ओळख, वाचन, लेखन, गाणी, शब्द बोलणे (शिष्टाचार) छान जमते. मुलांमध्ये इंग्रजी विषयाची आवड निर्माण झाली. सृजनशीलता वाढली. मानसिक, शारीरिक बौद्धिक प्रगती साधली गेली.

## कृतींचा क्रम

1. अक्षरांचे अवयव ओळख, वाचन, लेखन सराव.
2. अल्फाबेट्स-इंग्रजी मुळाक्षरे ओळख, लेखन, वाचन, सराव
3. इंग्रजीतून ओळख- प्राणी, पक्षी, फळे, फुले, भाज्या, शरीराचे अवयव, रंग
4. इंग्रजीतून 1 ते 10 अंक ओळख
5. गाणी

## नवोपक्रमात घेण्यात आलेले उपक्रम

1. अक्षरांचे अवयव लेखन, वाचन
2. अक्षरांचे अवयव जोड्या लावा

3. इंग्रजी मुळाक्षरे A to Z लेखन, वाचन
4. इंग्रजी मुळाक्षरांच्या जोड्या लावणे.
5. इंग्रजी मुळाक्षरे व चित्र पाहून जोड्या लावणे.
6. चित्र पाहून अक्षराला गोल करणे.
7. इंग्रजी मुळाक्षरे- रिकाम्या जागा भरा.
8. गाणी

## Two Little Hands

Two little hands,

To clap, clap, clap;

Two little legs,

Go tap, tap, tap.

Two little eyes,

Are open wide.

One little head,

Goes side to side.

## Head and Shoulder

Head and shoulder

Knees and toes.

Knees and toes

Eyes, ears, mouth and nose

## Teddy Bear

Teddy bear, teddy bear,

Turn around.

Teddy bear, teddy bear

Touch the ground

Teddy bear, teddy bear

Polish your shoes,

Teddy bear, teddy bear

Off to school.

## Jhonny ! Jhonny !

Johnny ! Johnny !

Yes, papa.

Eating sugar ?

No, papa

Open your mouth

Ha ! Ha ! Ha !

## Ten Little Fingers

Ten little fingers,

And ten little toes,

Two little ears

And one little nose,

Two little eyes

That shine so bright,

One little mouth

To kiss mother

‘Good Night’

## One, Two, Buckle My Shoe

One, two,

Buckle my shoe;

Three, four,

Shut the door;

Five, six,

Pick up sticks;

Seven, eight,

Lay them straight;

Nine, ten,

A big fat hen.

## The ABC Song

A B C D E F G H I J K L M

N O P Q R S T U V W X Y Z

Now you know my ABCs

Next time won't you sing with me.

या उपक्रमामध्ये अंगणवाडीतील सर्व बालके सहभागी आहेत. माझ्या अंगणवाडीत 3 ते 6 वर्ष बालके 60 आहेत. दररोजची उपस्थिती 40 असते. इतर 20 बालके शाळेत जातात. अर्धवेळ अंगणवाडीत येतात. व आहार घेऊन जातात.

माझ्या अंगणवाडीतील बालकांना इंग्रजी अक्षरे ओळख, वाचन, लेखन, गाणी, शब्द बोलणे (शिष्टाचार) सराव पेपर सोडवणे छान जमते. मुलांमध्ये इंग्रजी विषयाची आवड निर्माण झाली. सृजनशीलता वाढीस लागली. मानसिक, शारीरिक, बौद्धिक प्रगती साधली गेली, बालकांचे हस्ताक्षर सुधारले. स्मरणशक्ती, विचारशक्ती वाढीस लागली. आत्मविश्वास वाढला. या नवोपक्रमामुळे बालकांची उपस्थिती वाढली. आनंदाने हसत खेळत मुले शिक्षण घेऊ लागली. त्यामुळे पालक ही आनंदी झाले. मलाही मुलांसाठी प्रयत्न करण्याची संधी व समाधान लाभले. "ही चिमुकली फुलपाखरे म्हणजे अंगणवाडीचा श्वास आहे, त्यासाठी सदैव प्रयत्न करत राहणे हा माझा ध्यास आहे". या बालकांमुळेच अंगणवाडीमध्ये चैतन्य नांदत आहे. अंगणवाडी मध्ये मन प्रसन्न होते, या चिमुकल्यांसोबत आम्हीही बालपण उपभोगत असतो. अंगणवाडीमध्ये "बालकांना प्रोत्साहन" हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्रोत्साहन ही अशी गोष्ट आहे, ज्याने सामान्य माणूस देखील असामान्य काम करू शकतो. आमच्या मुख्य सेविका कविता जाधव मॅडमनी बालकांना व मलाही वेळोवेळी प्रोत्साहन दिल्यामुळे नवीन कार्य करण्याची संधी लाभली. सृजनशीलता वाढीस लागली.

या नवोपक्रमामध्ये श्रवण व संभाषण यावर अधिक भर दिला आहे. बालकांच्या मेंदूची वाढ ही पहिल्या 5 वर्षात सर्वाधिक होते. या कालावधीत शारीरिक वाढीच्या तुलनेत मेंदूची वाढ ही जास्त असते. याकरिता बालकाची भरपूर खेळणे, संवाद साधणे, त्याला स्पर्श करणे यामुळे मेंदूच्या वाढीला अधिक चालना मिळते व बालक हुशार बनते. या काळात बालकांचा भाषा विकास होतो. सतत जी भाषा कानावर पडते ती भाषा बालक बोलण्यास सुरू करतो. त्यामुळे अंगणवाडीत चित्रे, खेळणी, तक्त्यांद्वारे प्राणी, पक्षी, भाज्या, फळे, फुले, रंग, वाहने यांची नावे इंग्रजीतून सांगितली. तसेच युनिसेफ कडून दररोज प्राप्त होणाऱ्या युट्युब लिंक चा वापर करून मुलांना गाणी ऐकणे व बोलणे ही कृती करून घेतली आहे.

बालकांच्या प्रत्येक कृती, संभाषणाला प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक प्रगती झाली. सृजनशीलता वाढीस लागली.

## उपक्रमामधील कार्यवाहीत आलेल्या अडचणी

1. सप्टेंबर महिन्याअखेर हवामान बदलल्यामुळे व ऊन पावसामुळे बहुतेक मुले ताप, सर्दी, खोकल्याने आजारी होती.
2. सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये डोळे येणे ही साथ चालू झाली ती ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत होती.
3. खूप बालके आजारी असल्यामुळे पुन्हा-पुन्हा उजळणी घ्यावी लागली व सराव करून घ्यावा लागला.

## नवोपक्रमाची यशस्विता

1. बालकांची अंगणवाडीतील उपस्थिती वाढली.
2. बालकांमध्ये आत्मविश्वास वाढला.
3. इंग्रजी भाषेविषयी आवड निर्माण झाली.
4. बालकांमध्ये उत्साह निर्मिती झाली. हसत खेळत आनंदाने शिकणे सोपे झाले.
5. अंगणवाडीतून धान्य मिळते म्हणून बालकांना अंगणवाडीत पाठवण्यापेक्षा, ज्ञानाच्या, शिक्षणाच्या ओढीने बालके अंगणवाडीत येऊ लागली.
6. हा नवोपक्रम 80 टक्के यशस्वी झाला. बालकांमध्ये विविध कौशल्य विकसित झाली.
7. हा नवोपक्रम आणखी सराव घेतल्यावर एप्रिल 2023 पर्यंत सर्व बालकांमध्ये शंभर टक्के यशस्वी होईल याची खात्री आहे.
8. हा नवोपक्रम बालकांमधील विविध कौशल्य विकसित करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला आहे. हा असाच पुढे दरवर्षी घेण्याची ध्येय मनाशी बाळगले आहे.
9. या नवोपक्रमामुळे इंग्रजी विषयाचा पाया भक्कम होऊन, सृजनशीलता वाढीस लागली.
10. या नवोपक्रमाचा फायदा इतर अंगणवाडी सेविका व बालकांसाठी सोपा, सहज व सोयीस्कर होणार आहे.










सुस्वागत

## समारोप

माझ्या अंगणवाडीतील बालकांसाठी “या फुलपाखरांनो अंगणवाडीत इंग्रजी शिकूया” हा नवोपक्रम घेण्यात आला. या उपक्रमामुळे बालकांमध्ये आत्मविश्वास वाढला. इंग्रजी भाषेची आवड निर्माण झाली. मुले आनंदाने अक्षर ओळख, वाचन, लेखन, गाणी बोलू लागली. यामुळे पालकांमध्येही आनंद, उत्साह निर्मिती झाली. मनोरंजनातून हसत खेळत शिक्षण सोपे झाले. अंगणवाडीतील बालकांची उपस्थिती वाढली. हा नवोपक्रम साकारण्याच्या निमित्ताने प्रेरणा देणाऱ्या सहकार्य करणाऱ्या व्यक्तींच्या प्रति ऋण व्यक्त करण्याचा माझा हा अल्पसा प्रयत्न...

या उपक्रमासाठी मार्गदर्शक ठरलेल्या मुख्यसेविका सौ. कविता नरेंद्र जाधव मॅडम व प्रोत्साहन देणारे आमचे बालविकास प्रकल्प अधिकारी माननीय श्री. शरद तु. कुऱ्हाडे सर यांचे मन:पूर्वक आभार मानते.

सदैव मदत करणाऱ्या माझ्या मदतनीस मैत्रिणी साधना जगताप व माया कामतकर यांचे मनःपूर्वक आभार मानते. तसेच या उपक्रमासाठी माझा मुलगा अवधूत डेळेकर व माझी मुलगी अवंतिका डेळेकर यांनी मला मोलाची मदत केली व साथ दिली . हेच माझ्या नवोपक्रमाचे खरे वाटेकरी आहेत.

माझ्या नवोपक्रमात मोलाची कामगिरी बजावणारे माझे अंगणवाडीतील छोटे चिमुकले व पालक यांच्यामुळेच हा उपक्रम साध्य झाला हे त्यांचेच खरे यश आहे. अखंड साथ देणाऱ्या सर्व माझ्या हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार....

|| धन्यवाद ||

## संदर्भ ग्रंथ

1. आकार बालशिक्षणक्रम आधारित (अंगणवाडी सेविकांसाठी हस्तपुस्तिका)
2. बालशिक्षणक्रम - आकार या पुस्तकांचे साहाय्य घेतले.
3. युनिसेफ कडून येणाऱ्या युट्युब लिंक चा वापर केला.
4. ICDS कडून प्राप्त- पूर्व शालेय संच (खेळणी) याद्वारे उपक्रम घेणे सोपे झाले.

व्हिडीओ लिंक-

https://youtu.be/ug3uH_r1rUI

# प्रमाणपत्र

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीम./डॉ.वैशाली सुभाष डेळेकर हे/ह्या माझ्या शाळेत/कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला **या फुलपाखरांनो अंगणवाडीत इंग्रजी शिकू या** हा नवोपक्रम त्यांनी स्वतः राबविलेला असून तो त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक:17/11/2022

स्थळ:मानखुर्द मुंबई

शाळा /कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

17.11.2022

नाव:श्री. एस. टी. कुऱ्हाडे

शिक्का:

Child Development Project Officer
ICDS(Urban) Mankhurd, Mumbai

## प्रतिज्ञापत्र

मी श्री./श्रीम./डॉ. वैशाली सुभाष डेळेकर प्रतिज्ञापत्र लिहून देतो/ देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला **या फुलपाखरांनो अंगणवाडीत इंग्रजी शिकू या** हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही .तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधन माहितीच्या आधारे हा नवोक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठीसादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेउन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act 1957 खाली दखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक:- 17-11-2022

स्थळ: मानखुर्द, मुंबई

स्पर्धकाची स्वाक्षरी

Delekar

नाव: सौ. वैशाली सुभाष डेळेकर

शाळेचा/कार्यालयाचा शिक्का